**''प्रेस नोट''** दिनांक ०१/१२/२०२४

मलबार हिल पोलीस ठाणे हद्दीमध्ये अॅमेझॉन, फ्लिपकार्ड हया ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातुन मागणी करण्यात आलेल्या वस्तु डिलेव्हरी करण्याकरीता आलेल्या डिलीव्हरी बॉयचे पार्सल बॅग चोरी झालेल्या संदर्भात मलबार पोलीस ठाणेस सलग गुन्हे गु.र.क्र २३१/२४, गु.र.क्र २३८/२४, गु.र.क्र २५५/२४ कलम ३०३ (२)भान्यासं अन्वये दाखल आहेत.

मलबार हिल पोलीस ठाणे परिसरात सातत्याने होणाऱ्या अशाप्रकारे वारंवार होणाऱ्या चोरीबाबत पोलीस ठाणेकडुन गंभीर दखल घेवून सदर गुन्हयांचा तपास प्राधान्याने घेण्यात आला होता. सदर गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने मलबार हिल पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून अहोरात्र विशेष तपास करण्यात येवून तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने संशयित आरोपी नामे लखन नारायण वाघमारे वय ३५ वर्षे यांस प्रेमनगर झोपडपट्टी वरळी येथून रहात्या घरी सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीकडे गुन्हयाकडे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने वरील प्रमाणे गुन्हयांची कबुली दिल्यावरून त्यास अटक करण्यात आली आणि गुन्हयामध्ये चोरीस गेलेली मालमत्ता पोलीस ठाणेकडुन हस्तगत करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मलबार हिल पोलीस ठाणेकडून करण्यात येत आहे.

सदरचे गुन्हे हे अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई - डॉ. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ०२- डॉ. मोहित कुमार गर्ग, स.पो.आ. गावदेवी विभाग - श्रीमती सुमन चव्हाण, व.पो.नि. - श्री उदयसिंग शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मलबार हिल पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि माने व पोउनि गिते, पो.ह.क्र ००३६५/जाधव, पोशि ११३३६२/लाडगांवकर, पोशि ११०२९२/कुटे, पोशि १३०४७८/सानप पो.ह.क्र ०७०८४५/माचेवाड पोशि ०९२३५६/भगत, पोशि १११८९८/कोकणी आणि पोशि ११०८६५/तडवी, गुन्हे प्रकटीकरण पथक, मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई पोशि १४०३१२ /कांबळे यांनी उघडकीस आणलेले आहेत. अशाप्रकारच्या चोरीच्या घटना आढळून आल्यास पोलीसांशी तात्काळ संपर्क करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# छायाचित्र

